शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जनसेवा ग्रुप व आनंदनगरी संस्थेचा आदर्श उपक्रम

## शेतकऱ्यांना बियाण्यांसह खतही देणार; दानशूरांना मदतीचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जालना जनसेवा ग्रुप आणि आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था पुढे सरसावली आहे. लोकसहभागातून शेतकऱ्यांना गहू, हरभरा बियाणे आणि खताच्या किटचे मोफत वाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला असून, जिल्ह्यातील सामाजिक संवेदनशीलतेचे हे एक उत्तम उदाहरण ठरत आहे. या उपक्रमात पुरुषोत्तम मोतीवाला, शिवरतन मुंदडा, नरेश गुप्ता, डॉ. रामनारायण जयस्वाल, गोवर्धन अग्रवाल, पन्नालाल बगडिया, संजय बाहेती आणि रवींद्र बांगड यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवाई फुलवण्यासाठी घेतलेले हे प्रयत्न समाजास प्रेरणादायी आहेत. संकटसमयी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून सेवाभावातून शेतीला बळ देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### निराशा पुन्हा आशेत बदलू शकते

पूरग्रस्त शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. अनेकांच्या शेतात माती वाहून गेली आणि त्यांच्या जगण्याची पाळेमुळेच निघून गेली. पण आपण सर्वजण मिळून जर खारीचा वाटा उचलला, तर हीच निराशा पुन्हा आशेत बदलू शकते. एका किटचा खर्च फक्त ४ हजार रुपये आहे. यामध्ये गहू-हरभऱ्याचं बियाणं आणि खताची बॅग आहे. ही मदत म्हणजे दान नव्हे, तर देशाच्या पोशिंद्याला दिलेला 'विश्वासाचा हात' आहे. गरीब पूरग्रस्त शेतकऱ्यांना एक किट द्या, एक शेतकरी वाचवा, एक कुटुंब उभारा.



**- पुरुषोत्तम मोतीवाला**
**अध्यक्ष, जालना जनसेवा ग्रुप**

अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांची पिके, जनावरांचा चारा आणि उपजीविकेचे साधनच वाहून गेले आहे. आता रब्बी हंगाम सुरू होत असताना, 'हातात काहीच नाही!' अशी हतबल अवस्था अनेक शेतकऱ्यांची झाली आहे. या संकटसमयी जालना जनसेवा ग्रुप व आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने लोकसहभागातून पूरग्रस्त गरीब शेतकऱ्यांना गहू, हरभऱ्याचे बियाणे व खताची बॅग असलेली किट मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे, त्यासाठी दानशूर दात्यांनी मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाची अधिक माहिती देताना जालना जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला आणि आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शिवरतन मुंदडा यांनी सांगितले की, किटमध्ये ४० किलो गव्हाचे बियाणे, १० किलो हरभऱ्याचे बियाणे आणि रासायनिक खताची एक बॅग देण्यात येणार आहे. एका किटसाठी अंदाजे ४ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. व्यापारी, उद्योगपती, सेवाभावी संस्था आणि नागरिकांनी आपापल्या परीने जास्तीत जास्त किटचे योगदान दिल्यास जिल्ह्यातील पूरग्रस्त गरीब शेतकऱ्यांपर्यंत मोफत बियाणे आणि खत पुरवता येणार आहे. सर्वसामान्य नागरिकही ४००० रुपये योगदान देऊन एका शेतकऱ्याचे पालकत्व स्वीकारू शकतो. प्रत्येकाने 'खारीचा वाटा' उचलून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जालना जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, उपाध्यक्ष नरेश गुप्ता, सचिव डॉ. रामनारायण जयस्वाल, कोषाध्यक्ष गोवर्धन अग्रवाल, प्रकल्प प्रमुख पन्नालाल बगडिया, संजय बाहेती, आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शिवरतन मुंदडा आणि प्रकल्प प्रमुख रवींद्र बांगड यांनी केले आहे.

### आपणही होऊ शकता या सामाजिक उपक्रमाचा भाग - शिवरतन मुंदडा



अतिवृष्टी आणि पुरामुळे डोळ्यादेखत शेतकऱ्यांचं स्वप्न वाहून गेलं. त्यांच्या डोळ्यांतील वेदना पाहून मन हेलावलं. शेतमाल वाहून गेला, माती निघून गेली आणि आशेचा किरणही हरवला. म्हणूनच आम्ही ठरवलं की लोकसहभागातून गरीब शेतकऱ्यांपर्यंत गव्हाचं आणि हरभऱ्याचं बियाणं तसेच खताची बॅग पोचवायची. हा उपक्रम म्हणजे कोणत्याही एका संस्थेचा नव्हे, तर समाजाच्या संवेदनशीलतेचा पुरावा आहे. प्रत्येक नागरिक, व्यापारी, उद्योगपती यांनी आपल्या क्षमतेनुसार किटचे योगदान द्यावे. फक्त ४ हजार रुपयाचे आर्थिक योगदान देऊनही तुम्ही एका शेतकऱ्याला साथ देऊ शकता. योगदान देऊ इच्छिणाऱ्यांनी संजय बाहेती (९८२३१६२८८८) आणि रवींद्र बांगड (९७६५७७८८८८) यांच्या फोन पे क्रमांकावर आर्थिक योगदानाची रक्कम अदा करावी. एका किटचा अर्थ एका शेतकऱ्याच्या घरात पुन्हा दिवा पेटवणं! आपल्या छोट्याशा योगदानाने एखाद्या शेतकऱ्याचं आयुष्य पुन्हा फुलू शकतं. या सामाजिक उपक्रमाचा आपण भाग व्हावे असे आवाहन आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शिवरतन मुंदडा यांनी केले आहे.

# आरोग्य सेवा हिच खरी ईश्वर सेवा

## आमदार बबनराव लोणीकर; लोणी येथे मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिर



**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील लोणी येथे गुरुवार, ९ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि लोणी ग्रामपंचायतेचे सरपंच गजानन लोणीकर यांच्या सहकार्याने, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणी येथे संपन्न झाले. सकाळी १० वाजता आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते शिबिराचे उद्घाटन झाले.

जालना जिल्ह्यात यंदा अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व बोअरमध्ये दूषित पाणी मिसळले. यामुळे सर्दी, खोकला, डेंगू, मलेरिया, टायफॉइड आणि हिवताप यांसारख्या आजारांनी परतूर तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित या शिबिरात सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत तपासणी आणि उपचार उपलब्ध करून देण्यात आले. रक्तदाब, मधुमेह, डोळ्यांची तपासणी, तसेच डेंगू आणि मलेरियासारख्या साथीच्या आजारांवर विशेष लक्ष देण्यात आले. गरोदर माता, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष काळजी घेण्यात आली. उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, आरोग्य सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. निरोगी समाज हाच सशक्त समाजाचा पाया आहे. या शिबिरात आढळलेल्या सर्व रुग्णांवर 'महात्मा फुले जन आरोग्य योजना' आणि 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' यांच्याद्वारे मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. यासाठी पुढील महिनाभर विशेष शस्त्रक्रिया सत्र आयोजित केले जाईल. त्यांनी ग्रामस्थांना नियमित आरोग्य तपासणी आणि शिबिराचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले.

लोणी ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन लोणीकर यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व वैद्यकीय कर्मचारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचे आभार मानले. शिबिरात हजारो ग्रामस्थांनी सहभाग घेऊन मोफत तपासणी आणि औषधांचा लाभ घेतला. निरोगी गाव, सशक्त गाव! या ब्रीदवाक्यासह शिबिर यशस्वीपणे पार पडले. अशा शिबिरांचे लवकरच परतूर विधानसभा मतदार संघात ठीक ठिकाणी आयोजन करण्याचे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले. माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य सेवा शिबिराचे लोणी तालुका परतुर ग्रामपंचायतचे सरपंच गजानन लोणीकर यांनी लोणी तालुका परतूर येथे केले होते.

या वेळी जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर जयश्री भुसारे, सिव्हिल सर्जन डॉक्टर पाटिल, डॉ. कृष्णा कोरडे - सामान्य वैद्यकीय सेवा - कलावती हॉस्पिटल, जालना, डॉ. धनंजय घुगे - कर्करोग तज्ज्ञ - शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, डॉ. प्रफुल पाटील - दंत चिकित्सा - शासकीय दंत महाविद्यालय, परभणी, डॉ. सतीश मांटे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा, डॉ. प्रदिप लोखंडे - सामान्य शस्त्रक्रिया - खासगी क्लिनिक, मुंबई/मराठवाडा, डॉ. नितीन भोपळे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा, डॉ. अजित भांदरगे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. अनिरुद्ध पाटील - सामान्य वैद्यकीय - डॉ. आनंद पाटील क्लिनिक, लातूर, डॉ. उमेश जाधव - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा/कर्नाटक, डॉ. श्रीराम वानखेडे - सामान्य वैद्यकीय - श्रीराम हॉस्पिटल, डॉ. शालिग्राम जाधव - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, उस्मानाबाद/परभणी, डॉ. मधुसूदन तापडिया - वैद्यकीय/शैक्षणिक - शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र, डॉ. माधुरी कामखेडे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. सुदर्शन मांडे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, महाराष्ट्र/गुजरात, डॉ. सौरभ बरकुले - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. अपूर्वा सोनी - सामान्य वैद्यकीय/बालरोग - स्थानिक क्लिनिक, महाराष्ट्र/मध्य प्रदेश, डॉ. खान - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. चव्हाण - वैद्यकीय समन्वय - मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, मुंबई या अतिशय नामांकित डॉक्टरांनी आपल्या संपूर्ण यंत्रणेसह या शिबिरात उपस्थित नागरिकांना सेवा रुजू केली. परतूर भाजपा तालुकाध्यक्ष शत्रगुण कणसे, रमेशराव भापकर, सतीश राव निर्वळ,सुनीलराव लोणीकर, गणेश खवणे, पंजाबराव बोराडे, कैलास बोराडे, अंकुशराव बोबडे, संपत टकले, तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर, अशोकराव बरकुले, रवी सोळंके, मधुकर मोरे, गजानन लिपणे, कैलास शेळके, आनंद जाधव, सीताराम राठोड, नरेश कांबळे, उद्धव गुंजाळ, कैलास चव्हाण यांच्या सह उपविभागीय अधिकारी डॉक्टर पद्माकर गायकवाड, तहसीलदार डॉक्टर प्रतिभा गोरे, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तांगडे यांच्यासह ग्रामसेवक संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष डीपी काळे, ग्रामसेवक संघटनेचे परतुर तालुका अध्यक्ष बाबा चव्हाण या बरोबर कोकाटे हदगाव आष्टी श्रीष्टी सातोना या जिल्हा परिषद सर्कल मधील प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन सोसायटी सदस्य, ग्राम विकास अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक उपस्थित होते.




# प्रियदर्शनी कॉलनी येथे महानगर पालिकेचे आरोग्य केंद्र सुरू करा

## भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** प्रियदर्शनी कॉलनी, संभाजी नगर लक्कडकोट परिसरात महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.



यावेळी निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरातील प्रियदर्शनी कॉलनी, संभाजी नगर, लक्कडकोट, पासी चौक, कांबळेचा मळा, माणिक नगर, शिवाजी नगर म्हाडा कॉलनी, ढवळेश्वर, शेर सवार कॉलनी, भोकरदन नाका, सकलेचानगर, जिजामाता कॉलनी, ढवळेश्वर, हिंद नगर, शिक्षक कॉलनी अशा अनेक वसाहतींत हजारो नागरिक वास्तव्यास आहेत. या सर्व भागांचा मुख्य केंद्रबिंदू संभाजी नगर परिसर असूनदेखील येथे एकही आरोग्य सेवा केंद्र नाही. स्थानिक नागरिकांना लहान-मोठे आजार झाल्यास उपचारासाठी मोठ्या घाटी रुग्णालयात किंवा खासगी दवाखान्यात जावे लागते. गरीब नागरिकांना उपचारासाठी लागणारा खर्च परवडत नाही, तर घाटी रुग्णालयात रांगा आणि विलंबामुळे वेळेत उपचार मिळत नाहीत. त्यामुळे परिसरात महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र सुरू झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असे भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले आहे.

यावेळी भाजपा शाखा अध्यक्ष राजेस देसार, उपाध्यक्ष अनिल नवमहलकर, सचिव शेखर पवार, सागर घुगे, विकास नखलव, पुरुषोत्तम सोसे, कृष्णा नखलव आदींची उपस्थिती होती.

# वीज कामगारांचा संप सुरू

## ग्राहकांच्या हितासाठी आंदोलन, खाजगीकरणाला विरोध



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील वीज ग्राहकांच्या हितासाठी आणि सार्वजनिक वीज उद्योगाचे खाजगीकरण रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते आणि अधिकारी कृती समितीने ९ ऑक्टोबरच्या शून्य वाजल्यापासून ७२ तासांच्या संपाची हाक दिली असून, या संपाला राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. राज्यातील महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांमधील तब्बल ८५ हजार कामगार, अभियंते आणि अधिकारी संपात सहभागी झाले असून, या संपामुळे वीज वितरण सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

कृती समितीने सांगितले की, महावितरणच्या नफ्याच्या क्षेत्रात अदानी, टोरेंटो यांसारख्या खाजगी कंपन्यांना वीज वितरणाचे परवाने देण्याच्या हालचाली, ३२९ विद्युत उपकेंद्रे खाजगी कंत्राटदारांकडे देण्याचा निर्णय, तसेच महानिर्मिती कंपनीच्या चार जलविद्युत केंद्रांचे खाजगीकरण आणि महापारेषण कंपनीच्या प्रकल्पांचे खासगी हस्तांतरण या सर्व निर्णयांचा तीव्र विरोध केला जात आहे.

महापारेषण कंपनीचे २०० कोटी रुपयांचे प्रकल्प खाजगी कंपन्यांना देणे, तसेच ती कंपनी शेअर बाजारात सूचीबद्ध करण्याचा प्रयत्न हे निर्णय देखील कर्मचाऱ्यांच्या संतापाचे केंद्रबिंदू ठरले आहेत.

कृती समितीने स्पष्ट केले की, हा संप कोणत्याही वेतनवाढ किंवा आर्थिक लाभांच्या मागणीसाठी नाही, तर वीज ग्राहकांना दर्जेदार, स्वस्त आणि तत्पर पान २ वर

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी. गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख. गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो. ९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते. गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**










दिवाळीसाठी मार्केटमध्ये आकाश दिवे हार झेंडूचे बोळके पणत्या व कपड्यांचे दुकाना मोठ्या थाटात सजले आहे व आजाद ग्राउंड वर फटाक्याचे दुकानांची तयारी दिसून येत आहे ( छायाचित्र - किरण खानापुरे )

# माणसातील हरवलेली मानवता जागृत करणारं 'जागरण'

अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या साहित्याचा तेजस्वी व आकर्षक आलेख गगनाला भिडवणारे आणि तळागाळातील दीनदलित, शोषित, पिडित, वंचित, उपेक्षितांना आपल्या निर्भिड लेखणीच्या माध्यमातून जागृत करणारे व त्यांना निडरपणे व बेडरपणे जगायला शिकवणारे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लेखक, कवी, साहित्यिक तथा वात्रटीकाकार आणि हजारो युवकांचे आयडॉल व माझे मार्गदर्शक भारत सातपुते सर यांनी लिहिलेले जागरण नावाचे दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण पुस्तक नुकतेच वाचनात आले. हे जागरण नावाचे पुस्तक वाचताना सातपुते सरांनी आपल्या बालपणापासून ते आतापर्यंतच्या सर्व आठवणी, जीवनात आलेले चांगले वाईट प्रसंग, त्यांना गरिबीचे व जातीयतेचे सोसावे लागलेले विखारी चटके आणि शिक्षकी पेशा सांभाळत असताना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांची निष्क्रियता, काम चुकारपणा, आळशीपणा, चालढकलपणा तसेच तालुक्याचे व गावाचे राजकारण शाळेत आणणे आणि शिकवताना टंगळमंगळपणा करणे आणि सरांना इथल्या व्यवस्थेमुळे सोसावे लागणारे असूडाचे जबरदस्त फटके हे त्यांनी जागरण या त्यांच्या आत्मचरित्रात अगदी पोटतिडकीने आपल्यासमोर ठेवले आहे. सातपुते सर हे अतिशय गरीब परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेले एक जबरदस्त व्यक्तिमत्व आहे. त्यांना जीवनात गरिबीला व दारिद्र्याला कसे हिंमतीने तोंड द्यावे लागले आणि शिक्षणासाठी कसा आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, हे त्यांनी जागरण या पुस्तकात अगदी सविस्तरपणे मांडले आहे. सरांना शालेय जीवनापासूनच लेखनाची खूप आवड होती. कविता लिहिणे, निबंध लिहिणे, वर्तमानपत्रात वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिणे हे सातपुते सरांचा शालेय जीवनापासूनच आवडता छंद होता. त्यांना पुस्तक प्रकाशित करताना बऱ्याच वेळा सावकाराचे कर्ज काढावे लागले आहे. त्यांनी जवळपास पाच डझन पुस्तके आजवर प्रकाशित केले आहेत. आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची दखल घेऊन त्यांना विविध सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय यंत्रणा यांनी विविध पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव केला आहे. आतापर्यंत त्यांना शंभर पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एवढे पुरस्कार मिळवणारा कवी व साहित्यिक माझ्या मते तर हल्ली सातपुते सर हे महाराष्ट्रातील एकमेव व्यक्तिमत्व असेल. त्यांच्या बऱ्याच कविता व लेख पुस्तकात अभ्यासक्रमासाठी समाविष्ट करण्यात आले आहेत. ते निरंतर व अहोरात्र लिहीत असतात. महाराष्ट्रात जेवढे कवी आहेत तेवढ्या कवींना लाजवणाऱ्या व आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या कविता या सातपुते सरांनी आपल्या




काव्यसंग्रहात लिहिलेल्या आहेत. जीवनाची वाटचाल करत असताना त्यांच्या वाटेवर अनेक बोचरी काटे आली, अनेक खाचखळगे आली, दुःखाचे डोंगर आडवे आले, जातीमुळे त्यांना अपमानास्पद व हीन दर्जाची वागणूक मिळाली, असा त्यांना जीवनाच्या विविध टप्प्यावर संघर्ष करावा लागला. त्यांच्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची व गरीब होती. सातपुते सरांना बंबई मिठाई खाण्यासाठी आईकडे रडगाणे लावल्यावर आई तुराट्यात खवून ठेवलेले केस गोळा करून त्याची बंबईमिठाई सरांना घेऊन द्यायची. त्यांना शालेय साहित्य व पुस्तके विकत घ्यायला पैसे नसायचे. तेव्हा त्यांना खूप खूप दुःख व्हायचे आणि त्यांचे डोळे ओले व्हायचे. पण ते खचून कधीच गेले नाहीत. उलट जिद्दीने पेटून उठून आपले काम करतच राहिले आणि उच्च शिक्षण शिकून शिक्षकाची नोकरी काबीज केली. त्याकाळी दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला लेखणीच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे महान काम त्यांनी केले. प्रशासनाला व येथील गुलामगिरीत खितपत पडलेल्या सामान्य माणसांना लेखणीच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम केले. शिक्षकी पेशा सांभाळत असताना त्यांनी चांगल्या वाईट शिक्षकांचे बारकाईने निरीक्षण करून वाईट शिक्षकांना लेखणीच्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला. आणि कर्तृत्ववान शिक्षकांचा लेखणीच्या माध्यमातून त्यांनी नेहमी सन्मान केला आहे. म्हणजे त्यांनी शिक्षकांना सुद्धा जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. जागरण हे असे आत्मचरित्र आहे की, ते मेलेल्या माणसाला,जसे की ज्यांना अस्तित्वाची जाणीव नाही अशा माणसांना जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून नक्कीच होणार आहे. म्हणून जागरण पुस्तक वाचणे ही काळाची गरज आहे. जागरण पुस्तक गुलामाला गुलामीची जाणीव करून देते. माणसाला माणूस असल्याची जाणीव करून देते. कर्तव्यात कामचुकारपणा करणाऱ्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जागृत करून कर्तव्यपरायणता शिकवते. हल्ली समाज झोपेत आहे. तो स्वतःच्या अस्तित्वाला विसरून गेला आहे, आणि माणसासारखे जीवन न जगता हैवानासारखे जीवन जगत आहे. माणुसकीला पायदळी तुडवून सख्ख्या भावासोबत मनामध्ये कपट धरून राहत आहे. गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्ख्या भावाचा काटा काढत आहेत. म्हणजे त्याच्यातील राक्षसपणा नष्ट होऊन माणूसपण जागृत होणे काळाची गरज आहे. आणि आपल्याला जर आपल्यातला माणूस व मानवता जागी करायची असेल तर आपण जागरण हे पुस्तक वाचलेच पाहिजे. जागरण हे पुस्तक एकदा हातात घेतले तर ते शेवट होईपर्यंत खाली ठेवूच वाटत नाही, इतके प्रभावी, आकर्षक व दर्जेदार पुस्तक आपल्याला भारत सातपुते सरांनी लिहून दिले आहे. प्रत्येकाने वाचावे अशा साध्या, सोप्या व सरळ भाषेत त्यांनी लिखाण केले आहे. हे पुस्तक कोणीही वाचले तरी समजते. माणसातील मानवता जागृत करून माणसाचे अस्तित्व प्राप्त करून देणाऱ्या सातपुते सरांना खरोखरच सलाम करावा वाटतो. त्यांचा जीवन संघर्ष व त्यांची समाजाप्रती असणारी अस्मिता सरांनी अतिशय मार्मिकपणे लिहून समाजाप्रती असणारी निष्ठा दाखवली आहे. फक्त वर्तमानपत्रात लिहिणे सोपे आहे. परंतु पुस्तके लिहिणे खरोखरच खूप कठीण काम आहे. जेवढे लेखक वर्तमानपत्रात लेख लिहितात त्यांचे कुठे एक दोन पुस्तके प्रकाशित झाले आहेत. परंतु सर काव्य संमेलन व शिक्षकी पेशा सांभाळत लेखन कार्य करतात, ही काय साधी गोष्ट नाही माय!

त्यांचा सतत होत असणारा सन्मान हाच त्यांच्या कार्याची खरी देणगी आहे. अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेले भारत सातपुते सर आज संबंध महाराष्ट्राच्या ओठावर आहेत. त्यांनी आपली एक आगळी वेगळी छाप लोकांवर पाडून समाजात एक जबरदस्त प्रतिमा तयार केली आहे. त्यांचा संबंध खूप मोठ्या लोकांसोबत आहे... तरीपण ते अगदी साधे राहतात...माझ्यासारख्या होतकरू व नवख्या लेखकाला वेळात वेळ काढून फोन लावतात आणि लिहिण्यासाठी आणखीन प्रोत्साहित करतात. शून्यातून विश्व निर्माण करणारे भारत सातपुते सर खरोखरच इतर कवींसाठी, लेखकांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचा जीवन संघर्ष भल्याभल्यांना थक्क करणारा आहे. त्यांच्या जागरण या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. हे आत्मचरित्र खरोखरच खूप वाचनीय व चिंतनीय आहे, ते वाचताना माणूस स्वतःला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो. सरांच्या पुस्तकाचे परीक्षण करण्याएवढा मी मोठा लेखक नाही हो...सरांच्या पुस्तकांची समीक्षा खूप मोठ मोठ्या लेखकांनी नामांकित वर्तमानपत्रांमध्ये केली आहे. सरांचा मित्रपरिवार खूप मोठा व दांडगा आहे. त्यांच्या कविता कोणालाही खूप आवडतात आणि मनाला भावतात, तेव्हा कोणताही माणूस मंत्रमुग्ध होऊन जातो. सरांची शैली एकदम जबरदस्त व व्याकरण दृष्ट्या खूप छान आहे. असं हे माणसातील मानवता जागृत करणारं जागरण प्रत्येकाने वाचावे,

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

**जागरण- भारत सातपुते**
**मांजरा प्रकाशन, लातूर**
**संपर्क - ८०८७६९५०००**

पान १ वरुन

## वीज कामगारांचा ...

सेवा देण्यासाठी आवश्यक व्यवस्था निर्माण व्हावी, यासाठी आहे.
महावितरणकडे सध्या ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक आहेत, परंतु त्यासाठी केवळ ६४८ उपविभाग आणि ८१,९०० मंजूर पदे उपलब्ध आहेत. कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असून, मोठ्या प्रमाणावर कंत्राटी पद्धतीने कामकाज चालवले जात आहे.
वाढलेल्या वीज ग्राहकसंख्येनुसार नवीन शाखा, उपविभाग व विभागीय कार्यालये निर्माण करावीत
कर्मचाऱ्यांचे कामाचे आठ तास निश्चित करावेत, २२ हजार रिक्त पदे मागासवर्गीय आरक्षणासह भरावीत, कंत्राटी कामगारांना कायम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, पगारवाढ करारानंतर प्रलंबित मागण्या तत्काळ निकाली काढाव्यात,
दि. ६ ऑक्टोबर रोजी ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव व महावितरण कंपनीचे अध्यक्ष-महाव्यवस्थापक यांच्याशी झालेल्या चर्चेत ठरलेल्या कार्यवृत्तामध्ये बदल करण्यात आल्याने, संघटनांनी असंतोष व्यक्त केला. त्यामुळे कृती समितीने ७२ तासांचा संप अनिवार्यपणे सुरू करण्याचा निर्णय घेतला.
या संपात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, सबोर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन, वीज कामगार काँग्रेस (इंटक), मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन, तसेच तांत्रिक कामगार युनियन (५०५९) यांचा सहभाग आहे.
कृती समितीने राज्यातील जनतेला आणि वीज ग्राहकांना सहकार्याचे आवाहन करताना म्हटले आहे की,
हा संप सार्वजनिक वीज उद्योगाचे रक्षण करण्यासाठी आणि ग्राहकांना स्वस्त वीज देण्यासाठी आहे. मा. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करून सन्माननीय तोडगा काढावा.
राज्यभर वीज कर्मचाऱ्यांच्या संपाला १००% प्रतिसाद मिळाल्याचे कृती समितीच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. संप पुढील दोन दिवसही कायम राहणार आहे.

# शेतकरी पुत्रांनो या पुढे कर्जमाफी नाही तर कर्जमुक्ती असे म्हणत जा - लक्ष्मण वडले

**परतूर । प्रतिनिधी -** शेतकरी पुत्रांनो, आपला बाप राष्ट्र आणि देश चालवण्यासाठी कर्जबाजारी झालाय, त्यामुळे तो काही गुन्हेगार नाही म्हणून आज पासून कर्जमाफी द्या असे न म्हणता कर्जमुक्ती द्या असे म्हणत जा. असे अवाहन उबाठा शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांनी उपस्थित शेतकरी बांधवाना केले. परतूर येथे ते मराठवाड्याचा हंबरडा या आंदोलनात मार्गदर्शन करत होते.

उबाठा चे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने आज मराठवाडाभर हंबरडा आंदोलन झाले. याचाच भाग म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर येथे छत्रपती शिवाजी नगर चौक ते उपविभागीय कार्यालयापर्यंत मोर्चाचे आयोजन केले होते.

या प्रसंगी वडले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांचे ८ हजाराचे सोयाबीन ३ हजारावर आणले म्हणजे पाच हजार रुपये क्विंटल कमी मिळाले. याउलट खतं, बि-बियाण्याचे भाव दुप्पट वाढले. आणि आमच्या सर्वाचं मालाचे भाव निमपट झाले तरीही शेतकरी जागा होत नसेल तर हा वर्ग मेलेला व मृत आहे का ? असा प्रश्न पडतो. सरकारी बाबू महाराष्ट बंद करून दाखवतील

सरकार ने सरकारी वर्गातील अधिकारी व क्रमाचारी यांच्या पगातून हज़ार रुपये कपात कातरून दाखवावे.

दुसऱ्याच दिवाशी हे सरकारी बाबू महाराष्ट बंद करून दाखवतील. शेतकरी हा जाती धर्माच्या नावावरर बंद करतो मात्र त्याने काळ्या आईच्या नावावर बंद करायला हवा. नाहीतर तुम्हा-आम्हाला मरावच लागेल. ज्यावेळेस काळी आई पिकल त्याचवेळेस तुमचे आमचे भलं होईल. सरकारने फक्त आरक्षणाचे खुळखुळे हातात दिलेले आहेत. काळया आईला प्रतिष्ठा दिली तरच भलं होईल आणि पोट भरणार आहे.

फडणवीस ने आंदोलने पेटवले व शेतकऱ्यांना हरवले

मुखमंत्री देवेंद्र फडणवीस याने मागील काही वर्षांपासून मराठा, धनगर, बंजारा, आदिवासी आदी समाजानाचे आंदोलने पेटवले व महागाई, रोजगार सारखे प्रश्न झाकून ठेवले यामुळे शेतकरी हरवला. हेच मुख्यमंत्री या आधी कर्जमाफी करणार असे तीनदा म्हणाले होते, अजित पवार हे चक्की पासिंग पासिंग असं म्हणाले होते. आता पवारांना उरावर घेतली. या तीन लुटारू टोळ्या आहेत. यांनी राज्याला व देशाला लुटलेय.

या सरकारने १२ लाख कोटी माफ केले मात्र यांना शेतकऱ्यांचे कर्ज माफ करता आले नाही. त्यामुळे आता हंबरडा मोर्चाचे काढलाय. यापुढे यांना खेटराचीच भाषा काळात असेल तर खेटर मोर्चाचे काढण्याचे नियोजन करा. असा सल्ला जिल्हाप्रमुख यांना दिला.

शासकीय अधिकारी हे घरगडी , आमदाराला विचार एवढे श्रीमंत कसे झालात ?

तहसीलदार, एसडीएम, बीडीओ, जिल्हाधिकारी हे सत्ताधाऱ्यांचे घरगाडी असल्यासारखे काम करत आहेत. बांधवानो तुमच्या आम दाराला विचारा मागील २०-२५ वर्षांपूर्वी तुमची परिस्थिती काय होती व आज तुम्ही एवढे श्रीमंत कसे झालात ?

उसावाले ३-३ तर काटा मारतात

कारखानदार हे उसाच्या ट्रक व ट्रॅक्टर मागे ३-३ टन वजनाचे काटा मारायलेत. म ोजून ऊस नेऊन पहा ते तुमचा ऊसच घेणार नाहीत. तसेच उसाची रिकव्हरी ३ ने कमी दाखयलेत. म्हणजे यामध्ये जवळपास १२०० रु. ट्रॅक्टर मागे शेतकऱ्याना लुटतात. असा थेट आरोपही वडले यांनी केला.

न्यायधिशांवर बूट फ ेकणारा जर मुस्लिम असता तर गळ्या जाळल्या असत्या

मा. न्यायधिश गवई साहेबांवर काल परवा एकाने बूट फेकून मारला. त्याचे काय झाले ? काहीही होणार नाही कारण तो त्यांचाच आहे. त्याच्या जागी जर एखादा मुस्लिम असता तर त्याला आतंकवादी घोषित करून देशातील गळ्या जाळल्या असत्या. असेही वडले म्हणाले.

आयुष्यात पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या मालातील कपात करणारा मुख्यमंत्री पहिला - नळगे

आपत्कालीन परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी शेतकऱ्याच्या माला मधूनच १५ रु. कपात करून मदत करणारा मुख्यमंत्री मी पहिल्यांदा पहिला. असे याप्रसंगी जिल्हाप्रमुख नळगे म्हणाले

फोटोजिवी व डुबुकउड्या मारणारा आमदार

एकीकडं अतिवृष्टीने चार गावं पाण्याखाली गेल्याने शेतकरी चिंतातुर होते. मात्र आमदार हे गुडघाभर पाण्यात डुबुकउड्या मारून फोटो काढण्यात व्यस्त होते. चारही निवाऱ्याच्या ठिकाणी ५०-५० लोकं राहत होते. अनेक शेतकरी हे यांच्या फोटो मुळे गावकुसाजवळ रोडवर झोपलेले होते. या सर्वांना आसपासच्या शेतकऱ्यांना व जनावरांना जगवले. आता



हेच आमदार व प्रशासन याच शेतकऱ्यांच्या टाळूवरचे लोणी खाण्यात व्यस्त आहेत - महेश नळगे यांची होती उपस्थिती

या हंबरडा मोर्चाचे प्रसंगी उपनेते लक्ष्मण वडले, मराठवाडा युवा सेना प्रमुख धर्मराज दानवे, जिल्हाप्रमुख म हेश लांडगे, मनसे जिल्हाप्रमुख प्रकाश बापू सोळंके, काँग्रेस चे जेष्ठ कार्यकर्ते एकनाथराव कदम, उबाठा उपजिल्हाप्रम ुख माधवराव मामा कदम, अशोकराव आघाव, तालुका प्रमुख भारतराव पंडित, मंठा तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, उपतालुकाप्रमुख रामचंद्र काळे, विठ्ठल वटाणे,संजय नागरे, देविदास खरात, विजय बोरुडे, मंठा विभागप्रमुख आशारामजी बोराडे , शिबवाजी मोरे, परतूर शहरप्रमुख दत्ता सुरुंग, मनसे तालुकाप्रमुख कृष्णा सोळंके यांच्यासह काँग्रेस, उबाठा व मनसे चे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यासाठी केले हंबरडा आंदोलन.. मागण्या - अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ५०हजार रुपये आर्थिक मदत जाहीर करावी. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्व कर्जातून कर्जमुक्त करा. पिक विम्याचे निकष तातडीने शिथिल करून पंचनामेची प्रक्रिया बाजूला ठेवत विम्याची रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा. अतिवृष्टीम ुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना जुन्या निकष न लावता योग्य आणि पुरेसा मोबदला द्या. आदी म ागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांना देण्यात आले.

# जुन्या बस स्थानक परिसरातील अस्वच्छ शौचालय, परिसरात घाणीचे साम्राज्य, सुस्थितीत करण्याची मागणी

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** गावातील सगळ्या ठिकाणी विशेष करून गावात घाणीचे साम्राज्य वाढले असून येथील खालच्या बसस्थानक मधील असलेली जुने बस स्थानक परिसरातील शौचालय अस्वच्छ असून ते अनेक दिवसांपासून स्वच्छ केलेले नाही. त्या परिसरात दुर्गंधी पसरत असून व गवत उगवले आहे. त्यामुळे ह्या अस्वच्छ परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. म्हणून



विनंती आहे की शौचालय त्वरित स्वच्छ करावे अशी मागणी गावकरी व व्यापारी यांच्या वतीने ग्राम पंचायत कार्यालयात जाऊन केली आहे. गावातील नाली सफाई बाजार स्थळी असलेली घाण येथील सर्वच अंगनवाडी येथे असलेली घाण आणि तिथे उघड्यावर होत असलेली संडास या मुळे गावकरी यांचे आरोग्य धोक्यात आले असून रुग्ण संख्येत वाढ झाली असून तत्काळ या बाबत अंम लबजावणी करण्याची सूचना या वेळी ग्राम पंचायत ला करण्यात आली.

या अर्जावर खालील प्रमाणे नागरिकांच्या सही आहेत त्या पैकी श्री.जनार्दन रामकिसन झोरे.गजानन मुळे (शहर अध्यक्ष)
शुभम मुळे विशाल झोरे,राम ेश्वर खांडेभराड, योगेश शम ा,दिंगबर तांबेकर,कारभारी पाचे शिवाजी देशमुख, सुनील गवळी, लाला कुरेशी,नागेश डोंमळे, शेख जमीर, अमन खान सुनील डोमळे, आदी नागरिकांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सही या निवेदन वर आहे.

# भारती गाढे हिचे गोळा फेक स्पर्धेत मध्ये विशेष प्राविण्य



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुकास्तरीय मैदानी स्पर्धे त जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी भारती विष्णू गाढे हिने गोळफेक व थाळीफेक खेळात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी पात्र झाली आहे. त्याबद्दल तिचे संस्थेचे सचिव मा.सभापती श्री. लक्ष्मणराव पाटील दळवी, अध्यक्ष श्री. योगेश पाटील दळवी, संस्थेचे पदाधिकारी सौ.कासाबाई दळवी, दिनेश दळवी, गिता ताई गावंडे व प्राचार्य पंढरीनाथ शिंदे सर, क्रीडा शिक्षक भरत सिरसाट, श्री.राजू मिरगे सर, प्रशिक्षक मंगेश रगडे, प्रशासकिय अधिकारी आनंद वाघ तालूका क्रीडा संयोजक श्री .जंजाळ सर, अमोल मिरगे सर, श्री. चिकटे सर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.







# कठोर परिश्रम आणि कौशल्य हाच यशाचा खरा मंत्र - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जीवनात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर कठीण परिश्रमाशिवाय ते शक्य नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा, कौशल्य, प्रामाणिकपणा आणि सातत्याने केलेला प्रयत्न आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळेच यशाच्या शिखरावर पोहोचता येते. तरी कठोर परिश्रम आणि कौशल्य हाच यशाचा खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना मध्ये उद्योग-संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त गणेश चिमणकर, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अतुल केसकर, प्राचार्य रजनी शेळके, लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज काष्टीवर, मराठवाडा लघु उद्योग भारतीचे उपाध्यक्ष अविनाश देशपांडे, नरसिंह ट्रेडर्सचे गणेश पवार, संस्था व्यवस्थापक समिती विठ्ठल पवार, श्री काळे, सुधीर कापसे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल म्हणाल्या की, बदलत्या औद्योगिक युगात तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याचे आणि कौशल्य विकासावर भर देणे आवश्यक आहे. शासन विविध योजनांच्या माध्यमातून तरुणांना रोजगार व उद्योजकतेसाठी संधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.



आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, सद्यस्थितीत जागतिक स्तरावर आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर विद्यार्थ्यांनी अभ्यास करतानी करायला हवा. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बळकटीकरणासाठी अल्प मुदतीचे अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. ज्यामुळे आगामी काळात जे विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण करतील त्यांना निश्चितच रोजगार निर्मितीची संधी मिळेल. याठिकाणी आज मुंबई येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालय या ठिकाणी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या वतीने अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रम यामध्ये उद्योग संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ सोहळा पार पडला, याचे थेट प्रक्षेपण उपस्थित सर्व प्रमुख पाहुणे, विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरीक व अभ्यागतांना दाखविण्यात आले. या कार्यक्रमास अधिकारी-कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास कामाच्या जोरावर नगराध्यक्ष उमेदवारासह सर्व प्रभागात उमेदवार उभे करणार - मोहन अग्रवाल



**परतुर । प्रतिनिधी -** परतूर नगरपरिषदेच्या होत असलेल्या आगामी निवडणुका ह्या आम्ही आमच्या पॅनलच्या वतीने नगराध्यक्ष उमेदवारासह शहरातील सर्व २३ जागेवर उमेदवार केलेल्या विकास कामाच्या जोरावर उभे करणार असून सर्व जागेवर निवडणूक लढविण्याची तयारी झालेली आहे, आणि सर्व उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी सज्ज आहेत. संपूर्ण ताकदीसह सर्व उमेदवार निवडणूक मैदानात उतरणार असून येणाऱ्या काळात परतुर नगर परिषदेवर मोहन अग्रवाल गटाचा झेंडा लागेल असा आत्मविश्वास केलेल्या कामाच्या जोरावर आम्हाला वाटतो.मी कधीही नागरिकांना थापा मारल्या नाही सांगेन त्यांची कामे केलेली आहेत.मी करून दाखवले आहे.तसेच शहरातील सर्व जाती धर्माच्या नागरी वस्त्या मध्ये विविध विकास कामे कुठल्याही सविधानिक पदावर नसताना ५० कोटीची विकास कामे केलेली आहेत जर परतुरच्या जनतेने नगर पालिकेची सत्ता माझ्या हाती दिल्यास परतूर शहर महाराष्ट्रातील विकास कामा बाबत मॉडेल बनवून दाखवेल असे मोहन अग्रवाल यांनी उमेदवारांची झालेल्या बैठकीत आत्मविश्वास व्यक्त केला

# अतिवृष्टीग्रस्त अनुदानासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा समावेश

## आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिलेली माहिती

**जालना । प्रतिनिधी -** अतिवृष्टी अनुदान आणि मदतीपासून वंचित राहिलेल्या जालना जिल्ह्याचाही आता समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आठही तालुक्यातील बाधितांना राज्य सरकारकडून विशेष मदत जाहीर झाली आहे, अशी माहिती आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.



यासंदर्भात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, जालना जिल्हा अतिवृष्टीग्रस्त अनुदानापासून वंचित राहिला होता. परंतु जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजित दादा पवार यांच्याकडे मागणी लावून धरली. जालना जिल्ह्यात अतिवृष्टीने मोठे नुकसान झालेले आहे. याबाबतचे पंचनामेही झालेले आहेत. असे असतानाही पहिल्या यादीत जालना जिल्ह्याचा समावेश नव्हता. मात्र जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांना जिल्ह्यातील शेती आणि एकूण नुकसानीची माहिती देण्यात आली. प्रशासकीय पातळीवरही प्रत्यक्ष भेटी देऊन पंचनामे करण्यात आले. त्यामुळे जालना जिल्ह्यातील आठही तालुक्याचा अतिवृष्टीग्रस्त म्हणून समावेश करण्यात आलेला आहे.

अतिवृष्टीमुळे जालना जिल्ह्यात नुकसान झालेल्या सर्वांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. यात जिरायत शेतीसाठी हेक्टरी आठ हजार पाचशे रुपये तीन हेक्टर या मर्यादित दिले जाणार आहे. बागायत शेतीसाठी २२५०० दिले जातील. तसेच मृत दुधाळ जनावरांसाठी प्रत्येकी ३७५००, शेतकामास उपयोगी येणाऱ्या जनावरांसाठी ३२०००, लहान जनावरांसाठी २०००० तर शेळी आणि मेंढी साठी प्रत्येकी चार हजार रुपये मदत दिली जाणार आहे. अगदी कोंबड्यांसाठीही प्रत्येकी शंभर रुपये दिले जाणार आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून अथवा वाहून गेल्या त्यांना तातडीची मदत म्हणून हेक्टरी ४७ हजार रुपये दिले जाणार आहेत आणि सदरील जमीन पेरणीयोग्य करण्यासाठी रोहयो अंतर्गत प्रतिहेक्टर ३ लाख रुपये दोन हेक्टर या मर्यादित दिले जाणार आहेत. मृत व्यक्तीसाठी चार लक्ष रुपये त्यांच्या वारसांना दिले जाणार आहेत.याशिवाय ज्यांच्या घरांचे नुकसान झाले त्यांनाही मदत दिली जाणार आहे.

अतिवृष्टीने जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झालेले असून शासनाने शेतकरी आणि नागरिकांना विशेष पॅकेज जाहीर केल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री शिवसेनेचे नेते एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना धन्यवाद दिले पाहिजे असे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे.

# आहार, आरोग्य व अध्यात्मिक शिबीराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** शेगाव येथील पंचवटी फार्मच्यावतीने रविवार १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवीन मोंढा रोडवरील शिवाजीनगर म्हाडा कॉलनी भागात आहार, आरोग्य व अध्यात्मिक शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात तन, मन आणि आत्मामधील आमुलाग्र बदलाच्या रूपांतरणाच्या साधनेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या शिबीरात शेगाव येथील सौ. जया काळे आणि योगदूत सौ. स्नेहल काळे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# आई-वडील हेच आयुष्याचे खरे आकाश - प्रा. वसंत हंकारे

## आई-बाबा समजून घेताना उपस्थितांच्या डोळ्यात तरळले कृतज्ञतेचे अश्रू

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या युगात मुलं-मुली आपल्या आई- वडिलांपासून भावनिकदृष्ट्या दूर जात आहेत. त्यांच्या त्यागाचं, कष्टाचं आणि प्रेमाचं खरं महत्त्व तरुण पिढीला पुन्हा जाणवावं, या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ जालना आणि विक्रम टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आई- बाप समजून घेताना' या भावनिक आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात प्रख्यात वक्ते प्रा. वसंत हंकारे यांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू तरळले.

दानकुंवर महिला महाविद्यालयात ७ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मनसोपचार तज्ञ मानसी आयुष नोपानी, भाईश्री रमेशभाई पटेल, उद्योजक भावेश पटेल, दानकूंवर महाविद्यालय समितीचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक बनकर, दानकुवर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव, प्रशासकीय अधिकारी डॉ. विद्या पटवारी तर व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्षा काजल पटेल, सचिव डॉ. राखी जेथलीया, प्रकल्प प्रमुख सोनाली मनधना, मनीषा गणात्रा यांची उपस्थिती होती.

प्रा. वसंत हंकारे यांनी अत्यंत हळुवार, पण प्रभावी शब्दांत आई-वडिलांनी आपल्या मुलांसाठी केलेल्या त्यागाची जाणीव करून दिली.आई-वडील हे फक्त नातं नाही, ती प्रत्येक मुलाच्या अस्तित्वाची पायरी आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या बोलण्यातील प्रामाणिक भावना, अनुभवातून आलेली सच्चाई आणि भावनांचा आविष्कार एवढा परिणामकारक होता की, उपस्थित



विद्यार्थीनी, पालक आणि शिक्षक यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थिनींनी स्वतःच्या जीवनाचा पुनर्विचार केला. कार्यक्रमानंतर प्रतिक्रिया देताना उपस्थित मुलींनी सांगितले की, आज आम्ही पहिल्यांदाच आपल्या आई-वडिलांचा खरा अर्थ जाणला. त्यांनी केलेल्या त्यागाचं मूल्य समजलं. प्रा. वसंत हंकारे यांचा हा संवाद म्हणजे आजच्या पिढीसाठी जागृतीचा झंकार होता.

प्रास्ताविकपर भाषणात काजल पटेल यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. या कार्यक्रमाला इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या सदस्य रचना पित्ती, वर्षा अग्रवाल, कल्पना गोसरानी, छाया हंसोरा, अर्चना काबरा, सुनीता अग्रवाल यांच्यासह अडीच हजारावर मुली, पालक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक रोडिया यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. विद्या पटवारी यांनी मानले.

# पुणे ते छत्रपती संभाजीनगर दृतगती महामार्ग जालन्यापर्यंत वाढविणार

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरींकडून आ. खोतकर यांना प्रत्यक्ष भेटीत आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** पुणे ते छत्रपती संभाजीनगर दृतगती महामार्गाची लांबी जालना शहरापर्यंत वाढविण्यात येईल तसेच ड्रायपोर्टच्या रखडलेल्या कामास गती देऊन लवकरच काम पूर्ण केले जाईल, असे स्पष्ट आश्वासन केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी दिले. याशिवाय जालना शहरातील दोन प्रमुख रस्त्यांनाही निधीसह मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची गुरुवार (दि ९) रोजी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिल्ली येथे भेट घेतली. आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आणि त्यासंबंधी चर्चा केली. यावेळी जालन्यातील एक उद्योजक नंदकिशोर जेथलिया हेही उपस्थित होते. यावेळी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी सांगितले की, पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा महामार्ग जालना शहरापर्यंत वाढविण्यात येईल तसेच समृद्धी महामार्गाच्या इंटरचेंज पॉईंटला जोडण्यात येईल. तसेच ड्रायपोर्टचे रखडलेले काम गतीने पूर्ण करण्यात येईल. या कामात दिरंगाई करणाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल,



असेही स्पष्ट केले. एवढ्यावरच न थांबता ना. गडकरी यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. जालना शहरातील भोकरदन नाका ते ढवळेश्वर मार्गे भोकरदन चौफुली पर्यंतचा रस्ता तसेच राजमाता जिजाऊ चौक ते नाव्हा चौफुलीपर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. या दोन्ही रस्त्यांना निधीसह मंजुरी देण्यात येईल, अशी स्पष्ट ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. जालन्यापर्यंत वाढविला जाणारा महामार्ग आणि जालन्यातील रस्त्यांना दिली जाणारी मंजुरी ही जालनेकरांसाठी दिवाळी भेटच मानली जात आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.